माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तसेच सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम...

निवडणूक तात्काळ
ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१२/का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २५ जुलै, २०१८

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).*

**विषय :- माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तसेच सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम....**

**संदर्भ :-** आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.११/का-८, दि. २२/०५/२०१८ रोजीचा प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम.

महोदय/महोदया,

भारतीय संविधान आणि "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८" च्या तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका त्यांच्या मुदत समाप्तीपूर्वी घेण्याची सर्व ज़बाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. ही बाब विचारात घेता राज्य निवडणूक आयोगाने माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.११/का-८, दि. २२/०५/२०१८ अन्वये प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम निर्गमित केला आहे.

२. माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ मध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका तसेच सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या

रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी दिनांक १० जुलै, २०१८ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार संघाची यादी ग्राह्य धरून प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम राबविणे नियोजित आहे.

वरील बाबी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## आदेश

३. **मतदार यादी कार्यक्रमाची व्याप्ती**- माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ज्यांची प्रभाग रचना दि. ०९/०८/२०१८ च्या सुमारास पूर्ण होणार आहे तसेच सरपंच पदाच्या थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्याकरीता **मंगळवार दि. १० जुलै, २०१८ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी वापरण्यात यावी.**

४. **वरील मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील:**

| | | |
|---|---|---|
| (i) प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार | दि. १४/०८/२०१८ |
| (ii) हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | मंगळवार<br>सोमवार | दि. १४/०८/२०१८ ते<br>दि. २०/०८/२०१८ पर्यंत |
| (iii) प्रभागनिहाय मतदार यादीची जाहीर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे | शुक्रवार | दि. २४/०८/२०१८ |

५. **प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी तयार करणे:**

५.१ सार्वत्रिक तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी दि. १० जुलै, २०१८ हा विधानसभा मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक मानून **संगणक प्रणालीचा वापर करून मतदार यादीचा कार्यक्रम** राबविण्यात यावा.

५.२ **प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करून घ्यावी.**

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित ग्रामपंचायतींचा समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि त्या ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे (म्हणजेच संबंधित ग्रामपंचायतींतील विधानसभेच्या मतदार यादीत समाविष्ट असलेले सर्व

मतदार त्या ग्रामपंचायतींच्या सर्व प्रभागांसाठीच्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत तसेच, संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दीबाहेरील मतदार त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत) याची खात्री करावी.

आ) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का-५, दि. २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

इ) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दि. ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ई) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरूस्ती व पत्त्यांमधील दुरूस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दि.१७/०४/२०१५ चे आदेश)

**६. प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे.**

प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार/नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रारूप मतदार यादीला दि. १४/०८/२०१८ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

**७. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे.**

७.१ दि. १४/०८/२०१८ ते दि. २०/०८/२०१८ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करून प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त पुढीलप्रमाणे सुधारणा/दुरुस्ती करता येईल:-

i) लेखनिकांच्या काही चुका
ii) दुसऱ्या प्रभागातील चुकून अंतर्भूत झालेले मतदार
iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही ग्रामपंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करणे.

७.२ सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर वरीलप्रमाणे विचार करून त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात, जेणेकरून पुढील काळात याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत.

८. **प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे:**

अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करून त्याबाबतची सूचना दि. २४/०८/२०१८ रोजी मुद्दा क्र.९ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

९. प्रारूप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

अ) ग्रामपंचायत, तलाठी सजा, मंडळ अधिकारी, पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील सूचना फलकांवर

ब) स्थानिक वृत्तपत्रे

क) स्थानिक केबल टि.व्ही.

१०. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या **विधानसभेच्या मतदार यादीचे ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. (संदर्भ: शासनाच्या महसूल व वन विभागाचे दि. २४ /०४/२०१७ रोजीचे परिपत्रक)**

११. मतदार यादीचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतींबाबत **न्यायालयाचे अथवा अनर्हते विरोधातील अपिलासंदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास** त्या ठिकाणचा मतदार यादी कार्यक्रम रद्द करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१२. मतदार यादी कार्यक्रमाच्या टप्प्यावर प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्ह्याच्या **मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी व त्याचा अहवाल तत्परतेने आयोगास ई-मेलद्वारेच सादर करण्यात यावा.** आपल्या कामाचा आढावा मा. आयुक्त यांच्याकडून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी घेण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

१३. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोगाच्या संगणकीकरण शाखेकडून आज्ञावली प्राप्त करून घ्यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास दूरध्वनी (०२२-२२८८६९५०) किंवा ई-मेलद्वारे (sec.mh@gov.in) येथे संपर्क साधण्यात यावा.

१४. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१५. सदर प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीत पूर्ण होईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(र. ध. बेले)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत: परिशिष्ट

प्रत :-

१) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.
वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.

२) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व).
**मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.**

४) संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

५) कक्ष अधिकारी, रानिआ यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

६) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

७) राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

८) निवड नस्ती.

(परिशिष्ट)

*(आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१२/का-८, दि. २५ जुलै,२०१८ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.)*

**माहे ऑक्टोबर-२०१८ ते फेब्रुवारी-२०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तसेच सरपंच पदासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम.**

(मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक मंगळवार दि.१० जुलै, २०१८)

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार दि.१४/०८/२०१८ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | मंगळवार दि.१४/०८/२०१८ ते<br>सोमवार दि.२०/०८/२०१८ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय मतदार यादीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे. | शुक्रवार दि. २४/०८/२०१८ |

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या मान्यतेनुसार,

(र. ध. बेले)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र